# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 31.12.2025** **वार- बुधवार**

---

**<u>निवडणूक</u>**

महाराष्ट्रातल्या महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्जांच्या छाननीला आज सकाळी अकरा वाजता सुरूवात झाली. 2 जानेवारीला दुपारी 3 वाजेपर्यंत अर्ज मागे घेता येतील. 3 जानेवारीला निवडणूक चिन्हाचं वाटप झाल्यानतर अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध होणार आहे. येत्या 15 जानेवारीला मतदान होणार असून 16 जानेवारीला मतमोजणी होणार आहे. महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने निवडणुकीत पारदर्शकता राखण्यासाठी उमेदवारांच्या प्रचार खर्चासंदर्भात महत्त्वाचे बदल जाहीर केले आहेत. नव्या मार्गदर्शक सूचनांनुसार उमेदवारांनी केलेल्या प्रचार सभा, कार्यक्रमाची छायाचित्रे, देयकांसह खर्चाचा तपशील जोडणे अनिवार्य करण्यात आलं आहे. बँक व्यवहार आणि खर्चाचे लेखापरीक्षणदेखील करण्यात येणार आहे. मनपाच्या वर्गवारीनुसार खर्चमर्यादा निश्चित केली असून अ वर्ग मनपासाठी 15 लाख रुपये, ब वर्गासाठी 13 लाख रुपये, क वर्गासाठी 11 लाख रुपये तर ड वर्ग मनपासाठी 9 लाख रुपयांची मर्यादा घालण्यात आली आहे. खर्चाच्या नोंदीत तफावत आढळल्यास तसेच गंभीर उल्लंघन झाल्यास कठोर कारवाईचा इशारा आयोगानं दिला आहे.

**<u>उमेदवार</u>**

पिंपरी चिंचवड शहरात महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यात अनेक ठिकाणी तिरंगी आणि चौरंगी लढती होणार आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने 59 जागांवर , मनसेने 17 , काँग्रेस पक्षाने 60 तर आम आदमी पक्षाने 35 जागांवर उमेदवार उभे केले आहेत.

**<u>नववर्ष</u>**

नववर्षाच्या स्वागतासाठी पुणे आणि परिसरात तरुणाईमध्ये उत्साह पाहायला मिळत आहे. ख्रिसमस पासूनची सुट्टी अजूनही सुरु असल्याने पर्यटन स्थळं पर्यटकांनी गजबजली आहेत. नवीन वर्षांचं आगमन साजरं करण्यासाठी होणा-या गर्दीच्या पार्श्वभूमीवर शहर आणि परिसरात पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवला आहे. तसच वाहतुकीच्या नियमांचं उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येत आहे.

**<u>विजयस्तंभ</u>**

पुण्यातील कोरेगाव भीमा येथील ऐतिहासिक स्तंभ अभिवादन सोहळा ; उद्या म्हणजे १ जानेवारी 2026 रोजी साजरा होणार आहे. हा सोहळा शांतता आणि उत्साहात साजरा व्हावा यासाठी प्रशासन सज्ज असल्याचं प्रतिपादन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केलं आहे. यावर्षी अधिक अनुयायी येण्याचे गृहीत धरून आणि त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये यासाठी प्रशासन योग्य ती दक्षता घेत असल्याचंदेखील डूडी यांनी म्हटलं आहे. जिल्हा परिषदेच्यावतीने आरोग्य सुविधा, शुद्ध पाणी, स्वच्छतागृहे आदी सुविधा उभारण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर कायदा आणि सुवव्यस्थेच्यादृष्टीने मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. वाहनांसाठी वाहनतळदेखील उभारण्यात आला आहे. दरम्यान पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून 855 बस उपलब्ध करून देण्यात आल्या असून आज आणि उद्या लोणीकंद आणि शिक्रापूर विभागातून आंबेडकरी अनुयायांना विनातिकीट प्रवास करता येणार आहे.

**किडनी**

पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये घडलेल्या अवैध किडनी रॅकेट प्रकरणी राज्य शासनाने नेमलेल्या 10 सदस्यीय चौकशी समितीने उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली तपास करून 470 पानांचा अहवाल आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे सादर केला आहे. रुबी हॉल क्लिनिक प्रकरणानंतर राज्यातील आरोग्य व्यवस्था आणि कागदपत्रांतील त्रुटी हे मुद्दे पुन्हा समोर आले आहेत.अहवालाच्या आधारे दोषींविरुद्ध कारवाई केल्यास भविष्यात अशा प्रकारच्या गैरव्यवहारांना आळा बसेल, असा विश्वास आरोग्य प्रशासनानं व्यक्त केला आहे.

**एआय गोडबोले**

कृत्रिम बुद्धिमत्तेचे  तंत्रज्ञान जीवनाच्या अनेक क्षेत्रांत लवकरच जागा व्यापणार असून ते तंत्रज्ञान विवेकाधिष्ठित वापराने आत्मसात करणे आवश्यक असल्याचं प्रतिपादन ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ आणि लेखक अच्युत गोडबोले यांनी केलं आहे. 'ऑल इंडिया बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज फेडरेशनच्या दोन दिवसीय नवव्या अखिल भारतीय अधिवेशनात 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि कामगार वर्ग- संधी, आव्हाने आणि पुढील वाटचाल' या विषयावरील व्याख्यानात ते पुण्यात बोलत होते. 'ए आय' मुळे अनेक रोगांवर नियंत्रण मिळवणे सुलभ होईल असंही गोडबोले यावेळी म्हणाले.

**अभंग**

अभंगांच्या माध्यमातून समाजाला प्रबोधन करणे ही महाराष्ट्राची जुनी परंपरा असून डॉ. संजय उपाध्ये यांनी आजच्या काळात जगावं कसे हे सांगणारा ‘विवेक संहिता’ हा आधुनिक अभंगसंग्रह समाजासमोर आणला असल्याचं प्रतिपादन  एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक-अध्यक्ष डॉक्टर विश्वनाथ कराड यांनी व्यक्त केले. उपाध्ये यांनी रचलेल्या ‘विवेक संहिता’ या अभंगसंग्रहाचे प्रकाशन कराड यांच्या हस्ते एमआयटीत करण्यात आले त्यावेळी ते बोलते होते.

**कसबा**

पुण्याचं ग्रामदैववत श्री कसबा गणपतीच्या मूर्तीवरील शेंदूर काढण्याचा निर्णय मंदिराने घेतला होता; त्यासाठी काही दिवस मंदिर दर्शनासाठी बंद होतं. गणेश मूर्तीवरील सुमारे 900 किलो शेंदूर काढण्यात आला असून नागरिकांना आजपासून कसबा गणेश मूर्तीचं मूळ रूप पाहता येणार आहे. कसबा गणपती मंदिराच्या प्रमुख विश्वस्तांनी काल पत्रकार परिषदेत सांगितलं.

**सीबीएसई**

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी आणि बारावीच्या परीक्षांचं सुधारित वेळापत्रक जाहीर केलं आहे. दहावीची परीक्षा पुढील वर्षी 11 मार्चपासून सुरू होईल. तर बारावीच्या परीक्षेची तारीख 10 एप्रिल असेल. यापूर्वी या दोन्ही परीक्षा 3 मार्च रोजी होणार होत्या. प्रशासकीय कारणांमुळे वेळापत्रकात बदल करण्यात आल्याचं मंडळाने म्हटलं आहे. संलग्न असलेल्या सर्व शाळांनी ही माहिती आपल्या विद्यार्थ्यांना आणि पालकांना द्यावी, अशा सूचना मंडळाने दिल्या आहेत.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज 10 पूर्णांक 8 दशांश अंश सेल्सियस किमान तापमानाची नोंद झाली. येत्या 6 जानेवारीपर्यंत तापमान किमान 11 ते 13 दशांश अंश सेल्सिअस दरम्यान  राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**